RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ६१] बुधवार, मे १९, २०२१/वैशाख २९, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### जलसंपदा विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ मे २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.**

क्रमांक मजनिप्रा- २०२०/(२७/२०२०)/जसं(आस्था).— महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (५) आणि कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) व (ङ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, उक्त अधिनियमाच्या कलम ५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार दिनांक १२ ऑगस्ट २००५ च्या जलसंपदा विभागाची अधिसूचना क्रमांक मजनिप्रा. निवड २००५/(७८/०५) द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे सदस्य म्हणून पुढील व्यक्तींची त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जो दिनांक आधी येईल त्या दिनांकापर्यंत नियुक्ती करीत आहेत :—

(१) श्रीमती श्वेताली अभिजीत ठाकरे (अर्थव्यवस्था क्षेत्रातील तज्ज्ञ) ... सदस्य

(२) डॉ. विनय नारायण परांजपे (विधि क्षेत्रातील तज्ज्ञ) ... सदस्य

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय घाणेकर,**
शासनाचे सचिव (लाक्षेवि).

# WATER RESOURCES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 18th May 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.

No. MWRRA-2020/(27/2020)/WR(Estt).—In exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 3 read with clauses (*c*) and (*e*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah.XVIII of 2005), and of all other powers enabling it in that behalf, the Governor of Maharashtra, on the recommendation of the Selection Committee constituted under section 5 of the said Act, hereby appoints the following persons as the Members of the Maharashtra Water Resources Regulatory Authority, constituted under sub-section (*1*) of section 3 of the said Act *vide* Government Notification, Water Resources Department, No. MWRRA.Selection 2005/(78/2005), dated the 12th August 2005, for a term of three years from the date on which they enter upon their offices or till they have attained the age of seventy years, whichever is earlier, namely : —

(1) Smt. Shwetali Abhijeet Thakare ... Member
(Expert from the field of economics)

(2) Dr. Vinay Narayan Paranjape ... Member
(Expert from the field of law)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY GHANEKAR,
Secretary (CADA) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १४७] बुधवार, डिसेंबर १, २०२१/अग्रहायण १०, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३६३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## जलसंपदा विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.**

क्रमांक मजनिप्रा-२०२०/(२७/२०२०)/जसं(आस्था).—ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी शासन अधिसूचना, जलसंपदा विभाग क्रमांक मजनिप्रा-२०२०/(२७/२०२०)/जसं(आस्था), दिनांक १८ मे, २०२१ अन्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा.१८) मधील तरतुदीनुसार गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त प्राधिकरण " असा करण्यात आला आहे.) सदस्य म्हणून श्रीमती श्वेताली अभिजीत ठाकरे यांची अर्थव्यवस्था क्षेत्रातील तज्ज्ञ आणि डॉ. विनय नारायण परांजपे यांची विधि क्षेत्रातील तज्ज्ञ या पदावर नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, डॉ. विनय नारायण परांजपे, विधि क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी त्यांना सद्य:स्थितीत सदर प्राधिकरणाच्या सदस्य (विधि) या पदाचा कार्यभार स्विकारणे शक्य होत नसल्याचे कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांना डॉ. साधना सुनिल महाशब्दे यांना सदर प्राधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्त करणे उचित वाटले आहे ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (५) आणि कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड(ङ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार उक्त प्राधिकरणाचे सदस्य (विधि क्षेत्रातील तज्ज्ञ) म्हणून डॉ.साधना सुनिल महाशब्दे यांची त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जो दिनांक आधी येईल

त्या दिनांकापर्यंत नियुक्ती करीत आहेत आणि याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सदर अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करीत आहे :—

सदर अधिसूचनेमधील, अनुक्रमांक (२) येथे पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येत आहे :—

"(२) डॉ. साधना सुनिल महाशब्दे सदस्य ;".

(विधि क्षेत्रातील तज्ज्ञ)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजय कोहिरकर,**
शासनाचे सचिव.

## WATER RESOURCES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 30th November, 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.

No.MWRRA-2020/(27/2020)/WR(Estt).—Whereas, the Governor of Maharashtra has, *vide* the Government Notification, Water Resources Department, No. MWRRA-2020/(27/2020)/WR(Estt), dated the 18th May 2021, appointed Smt. Shwetali Abhijeet Thakare, an expert from the field of economics and Dr. Vinay Narayan Paranjape, an expert from the field of law, as Members of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (hereinafter referred to as " the said Authority ") constituted under the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005);

And whereas, Dr.Vinay Narayan Paranjape, an expert from the field of law, has communicated that it would not be possible for him at this stage to assume the role of member (Law) of the said Authority ;

And whereas, the Governor of Maharashtra considered it expedient to appoint an expert from the field of law, as a member of the said Authority ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 3 read with clause (e) of sub-section(*1*) of section 4 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005) and of all other powers enabling it in that behalf, the Governor of Maharashtra hereby, on the recommendation of the Selection Committee constituted under sub-section (*1*) section 5 of the said Act, appoints Dr.Sadhana Sunil Mahashabde, an expert from the field of law, as a member of the said Authority for a term of three years from the date on which she enters upon her office or till she has attained the age of seventy years, whichever is earlier, and for that purpose hereby amends the said Notification as follows, namely :—

In the said Notification, for entry at serial number (2), the following entry shall be substituted, namely :—

" (2) Dr. Sadhana Sunil Mahashabde, Member ; ".
(Expert from field of law)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJAY KOHIRKAR,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८) व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे सदस्य (अर्थव्यवस्था) व सदस्य (विधी) या पदांच्या नियुक्तीबाबत...**

-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-

## प्रसिध्दीपत्रक

१) महाराष्ट्र शासनाने राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे प्रमाणित, समन्याय व न्याय व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि कृषिविषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ अधिनियम करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण नावाच्या एका प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मध्ये प्राधिकरणावर अध्यक्ष व चार सदस्य नियुक्त करण्याबाबत तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार अधिसूचना दि.२४/१०/२०१७ अन्वये डॉ.शिवाजी त्रिंबकराव सांगळे यांची सदस्य (अर्थव्यवस्था) व श्री.विनोदकुमार जमुनाशंकर तिवारी यांची सदस्य (विधि) या पदावर ते रुजू झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी आपापल्या पदाचा कार्यभार दि. ०९/०१/२०१८ रोजी स्वीकारला होता. त्यांच्या पदांचा कालावधी दि. ०८/०१/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने मजनिप्रा अधिनियम, २००५ कलम ५(२) नुसार अध्यक्ष वा कोणताही सदस्य सेवानिवृत्त होण्याच्या किंवा त्याचा पदावधी समाप्त होण्याच्या सहा महिने अगोदर, ते रिक्त पद भरण्यासाठी निवड समितीकडे निर्देशित करील, या तरतुदीनुसार सदस्य (अर्थव्यवस्था) व सदस्य (विधि) या पदांकरिता इच्छुक तज्ज्ञ व्यक्तींचे अर्ज प्राप्त करुन घेण्याकरिता शासन पत्र दि.०७/१०/२०२० अन्वये शासनाच्या संकेतस्थळावर तसेच देशातील ४ महानगरातील प्रमुख वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०६/११/२०२० पर्यंत नामनिर्देशने मागविण्यात आली होती.

विहित कालावधीत उपरोक्त पदांसाठी आवश्यक असलेली पात्रता पुर्ण करणारे पर्याप्त अर्ज प्राप्त न झाल्याने अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढविण्यात येऊन दि.२७/११/२०२० पर्यंत नामनिर्देशने मागविण्यात आली. त्याबाबतची जाहिरात शासनाच्या तसेच मजनिप्राच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

उपरोक्त नमूद जाहिरातीस अनुसरुन शासनास खालीलप्रमाणे तज्ज्ञ व्यक्तींचे अर्ज प्राप्त झाले:-

| अ.क्र. | पद | प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या |
|---|---|---|
| १ | सदस्य (अर्थव्यवस्था) | १९ |
| २ | सदस्य (विधि) | १७ |

३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ३ च्या पोट कलम (५) मध्ये "प्राधिकरणाचा अध्यक्ष व अन्य सदस्य हे कलम ५ अन्वये घटित करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांकडून नियुक्त करण्यात येतील" अशी तरतुद आहे. तसेच कलम ५(४) मध्ये "निवड समिती, तिच्याकडे निर्देशित केलेल्या प्रत्येक रिक्त पदासाठी दोन नावांच्या नामिकेची शिफारस करील" अशी तरतूद आहे.

वर नमूद जाहिरातीस अनुसरुन विहित कालावधीत प्राप्त झालेल्या इच्छुक उमेद्वारांच्या अर्जांची छाननी करण्यात येऊन वैयक्तीक माहितीचा विश्लेषणात्मक तपशील मजनिप्रा (सुधारणा) अधिनियम, २०१६ कलम ५ मधील तरतुदीनुसार मा.मुख्य सचिव महोदयांचे अध्यक्षतेखालील गठीत करण्यात आलेल्या निवड समितीसमोर ठेवण्यात आला.

निवड समितीच्या दि.१९/०१/२०२१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्राप्त अर्जांनुसार अर्जदाराची व्यक्तीगत माहिती, अर्हता तथा अनुभवाच्या अनुषंगाने पात्रता निकष तपासल्यानंतर एकूण तज्ज्ञ व्यक्तींपैकी सदस्य (अर्थव्यवस्था) व सदस्य (विधि) या पदांसाठी पुढीलप्रमाणे दोन तज्ज्ञ व्यक्तींची नांवे नियुक्तीसाठी शिफारस करुन मा.राज्यपाल महोदयांकडे पाठवावी, प्रत्येक पॅनेल मधील क्र.१ ला प्रथम प्राधान्य आणि क्र.२ ला द्वितीय प्राधान्य राहील, असा एकमताने निर्णय घेण्यात आला.

**अ) सदस्य (अर्थव्यवस्था) या पदासाठी.-**

१) डॉ.शिवाजी त्रिंबकराव सांगळे

२) श्रीम.श्वेताली अभिजीत ठाकरे

**ब) सदस्य (विधि) या पदासाठी.-**

१) डॉ. साधना सुनिल महाशब्दे

२) डॉ. विनय नारायण परांजपे

बैठकीत झालेल्या निर्णयास अनुसरुन वरीलप्रमाणे प्रत्येक पदासाठी दोन नावांची शिफारस करण्यात येऊन प्रस्ताव मा.राज्यपाल महोदयांना सादर करण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण येथे सदस्य (अर्थ) या पदावर श्रीम. श्वेताली अभिजीत

ठाकरे व सदस्य (विधि) या पदावर डॉ. विनय नारायण परांजपे यांची नियुक्ती करण्यास मा.राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली.

मा.राज्यपाल महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई येथे सदस्य (अर्थव्यवस्था) या पदावर श्रीम. श्वेताली अभिजीत ठाकरे व सदस्य (विधि) या पदावर डॉ. विनय नारायण परांजपे यांची नियुक्ती करण्याबाबतची अधिसूचना दि. १८/०५/२०२१ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार श्रीम.श्वेताली ठाकरे यांनी सदस्य (अर्थव्यवस्था) या पदाचा कार्यभार स्विकारला आहे. तथापि, डॉ.विनय परांजपे यांच्या पत्नीचे कोरोना काळात निधन झाल्याने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे त्यांनी सदस्य (विधि) या पदावर रुजू होण्यास असमर्थता दर्शविल्याने सदरचे पद रिक्त होते.

४) सदस्य (विधि) हे पद रिक्त असल्यामुळे प्राधिकरणास कामकाज चालविणे अडचणीचे होत असल्यामुळे प्राधिकरणाकडून सदरचे रिक्त पद भरण्याबाबत वारंवार विचारणा होत होती. डॉ.परांजपे हे सदस्य (विधि) या पदाचा कार्यभार स्विकारण्यास इच्छुक नसल्याने सदरचे पद भरण्यासाठी पुन्हा नव्याने निवड प्रक्रिया राबविण्यामध्ये बराच कालापव्यय होऊन त्याचा परिणाम मजनिप्राचे कामकाजावर होण्याची शक्यता होती. यास्तव, वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद मा.राज्यपाल महोदयांना सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामधील (ब) सदस्य (विधि) या पदासाठी क्र.२) येथील डॉ.विनय नारायण परांजपे यांचे नांवाऐवजी क्र.१) डॉ.साधना सुनिल महाशब्दे यांचे नांवास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.राज्यपाल महोदयांना सादर करण्यात आला. त्यास मा.राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार सदस्य (विधि) या पदावर डॉ.साधना सुनिल महाशब्दे यांची नियुक्ती करण्याबाबतची अधिसूचना दि.०१/१२/२०२१ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली. डॉ.साधना सुनिल महाशब्दे यांनी सदस्य (विधि) या पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

( वि. गि. राजपूत )
सचिव (लाक्षेवि) तथा निवड समितीचे सदस्य सचिव
जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन

दिनांक.- ०९/०२/२०२२.